**Shikshan Sanshodhan** : Journal of Arts, Humanities and Social Sciences
Monthly, Peer-Reviewed, Refereed, Indexed Journal
Volume - 8, Issue - 9, September - 2025

ISSN(o): 2581-6241
Impact Factor: 7.384

DOIs:10.2018/SS/202509002 --:-- Research Paper / Article / Review

# बालसाहित्य स्वरूप आणि संकल्पना पुनरावलोकन

**सुष्मिता बाळासाहेब देवरे**
संशोधक विद्यार्थी
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
मालेगाव,नाशिक (महाराष्ट्र )
Email: sushsamrudhhi@gmail.com

**डॉ. स्नेहल संजय मराठे**
सहयोगी प्राध्यापक-मार्गदर्शक
म.स.गा. महाविद्यालय, संशोधन केंद्र
मालेगाव ,नाशिक (महाराष्ट्र)
Email: snehalmarathe2k13@gmail.com

**सारांश**

**"प्रौढत्वी निज शैशवास जपणे । बाणा कवीचा असे ।"**

कवी केशवसुतांच्या या उक्तीप्रमाणे बालसाहित्य लिहिणारा लेखक आपल्या लेखनामध्ये बालपण जपत असतो.
बालमनाची जाणीव ठेवत असतो.या संशोधन प्रबंधामुळे मुलात मूल होऊन जगण्याचे आपले बालमन पुन्हा अनुभवण्याची मला संधी मिळाली.
**"करी मनोरंजन जो मुलांचे,जडेल नाते प्रभूशी तयाचे"** या पंक्तीतून बालसाहित्याचे स्वरूप मनोरंजनाशी व बाल्सहित्यकाराचे नाते देवाशी कसे जोडले गेले आहे हे लक्षात येते.
बालसाहित्याचे स्वरूप जाणण्यासाठी आपल्याला बाल्साहित्यकारांनी केलेल्या बालसाहित्याच्या व्याख्या प्रामुख्याने अभ्यासणे आवश्यक आहे.
बालसाहित्याचा पाठ्यपुस्तकात समावेश असला तरी बालसाहित्य हे केवळ अभ्यासासाठी नसून ते अनुभवण्याची गोष्ट आहे, याची जाणीव मुलांना बालसाहित्यातून करून दिली गेली, तर मुले त्या साहित्याचा अधिक आस्वाद घेऊ शकतील हे बालसाहित्याच्या स्वरूपाचा आणि संकल्पनेचा अभ्यास केल्यावर लक्षात येते.

**मुख्य संज्ञा** : बालसाहित्य, नैतिक शिकवण, जिज्ञासापूर्ती, गुणधर्म.

## 1. प्रस्तावना :

बालसाहित्य म्हणजे बालकांसाठी असणारे साहित्य.या साहित्यामध्ये बडबड गीते, गप्पा, गोष्टी ,गाणी ,बोधपर गोष्टी आणि त्याचबरोबर मूल्यांशी निगडित गोष्टी सुद्धा यात समाविष्ट केलेल्या असतात. बालसाहित्याची भाषा समजण्यास साधी आणि सोपी असते की जेणेकरून बालकांना एखाद्या गोष्टीचा अतिशय सहजतेने आशय समजावा. चित्रांचा जास्तीत जास्त वापर आणि कमी शब्द अशा मांडणीच्या पुस्तकातून मुलांच्या कल्पनाशक्तीला वाव मिळतो.
'बदलता काळ बदलते बालसाहित्य' या विषयाकडे पाहिलं तर एक म्हणजे बदलता काळ आणि दुसरं म्हणजे बदलतं साहित्य. बदलत्या काळाची आव्हानं आपल्यासमोर व ती मुलांसमोरही आहेत. जेव्हा आपण बदलत्या काळातील बालसाहित्यावर बोलतो, तेव्हा मुलांसमोरील बदललेली आव्हानंही लक्षात घ्यावी लागतात.
साहित्याच्या अभ्यासात बालसाहित्य महत्त्वाचा प्रकार आहे. बालसाहित्य म्हणजे बालकांसाठी असणारे स्वतंत्र साहित्य. बाल साहित्याची व्याख्या आणि त्याचे स्वरूप कसे असते, हे समजावून घेणे आवश्यक आहे.

**'लहान मूल म्हणजे मातीचा गोळा**
**जसा आकार द्यावा तशी मूर्ती घडते'**

लहान मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी म्हणजेच सामाजिक, भावनिक, मानसिक, शारीरिक विकासासाठी बालसाहित्याची गरज असते.लहान मूल निरीक्षण आणि अनुकरण यातून शिकते. घरातील वडीलधाऱ्या व्यक्तींचे ते काळजीपूर्वक निरीक्षण करते. नंतर हळूहळू त्याचे अनुकरण करायला लागते. बालपणी माणूस सर्वात जास्त ग्रहणशील असतो. बालपण म्हणजे प्रत्येकाच्या जडणघडणीचा काळ असतो. यामध्ये आई, वडील आणि गुरु यांचा फार मोठा वाटा असतो.

लहान मूल सतत निरीक्षण करत असते. त्याच्या आजूबाजूला येणारे आवाज, होणाऱ्या हालचाली यातून ते परिसराचे ज्ञान मिळू

लागते.आईचे शब्द कानावर पडतात. अंगाई कानावर पडते आणि यातूनच मौखिक शिक्षणाला सुरुवात होते.अंगाई गीते त्यानंतर शिशु गीते बडबड गीते अशी या प्रवासाची सुरुवात होते.आसपासच्या सजीव निर्जीव गोष्टींचे ज्ञान होऊ लागल्यावर भौतिक जगाविषयी असणारे कुतूहल जागे होते आणि मग ते शमवण्यासाठी बालसाहित्य खूप उपयुक्त ठरते.

आजची मुले संगणक युगाचे अपत्य आहेत.आज जन्मलेली लहान मुले लगेचच भ्रमणध्वनीवर खेळ खेळू लागतात.आता असे वाढलेले मूल जेव्हा सक्तीची म्हणून केलेली मराठी भाषा शिकू लागेल, तेव्हा त्याच्यासाठी नवे बालसाहित्य नव्या जाणिवांचा विचार करून लिहायला हवे.

**2. संशोधनाची उद्दिष्टे :**

१. बालसाहित्याच्या प्राथमिक स्वरूपाचा अभ्यास करणे.
२. बालसाहित्याच्या वेगवेगळ्या व्याख्यांचा अभ्यास करून स्वरूप तपासणे.
३. बालसाहित्याच्या स्वरूपाच्या घटकांचा चिंतन करणे.
४. बालसाहित्याच्या भाषेचा अभ्यास करणे.
५. बालसाहित्य निर्मितीसाठी आवश्यक बालमनाचे गुणधर्म समजून घेणे.

**3. संशोधन पध्दती :**

सदर शोधनिबंधाच्या लेखनासाठी संशोधक विद्यार्थ्यांने ग्रंथालयीन पद्धतीचा वापर केलेला आहे. त्यामध्ये विविध संदर्भ ग्रंथांचा आढावा घेण्यात आला आहे. वर्णनात्मक पद्धती त्याबरोबर अनेक दुय्यम साधनांचाही वापर या लेखासाठी घेण्यात आला आहे त्याचबरोबर सदरील संशोधनासाठी नियतकालिके आणि वर्तमानपत्रातील लेख विचारात घेऊन निष्कर्ष काढले आहेत.

**4. बालसाहित्य व्याख्यांचा स्वरूप कळण्यासाठी केलेला अभ्यास**

बालसाहित्य लेखिका मालतीताई दांडेकर यांच्या मते बालमनाला स्पर्श करणारी आणि त्यांच्या जीवनावर सुसंस्कार करणारी स्फूर्तीदायक रचना म्हणजे वाङमय.

बालसाहित्याचे जाणकार गोपीनाथ तळवलकर म्हणतात बालमनाच्या गरजा अपेक्षा व मर्यादा असतील त्या लक्षात घेऊन लिहिलेले जे वाङमय असते त्याला बाल वाङमय म्हणता येईल अगदी सोप्या भाषेत लिहिलेले वाङमय बाल वाङ्मय होऊ शकत नाही जे वर्णन केले आहे त्याचे चित्र मुलांच्या डोळ्यासमोर उभे राहिले पाहिजे.

प्रसिद्ध हिंदी लेखक सोहमलाल द्विवेदी यांच्या मते खरे बालसाहित्य तेच तिच्या मुले सहजतेने आत्मसात करतील व जातील भावना त्यांच्याच भाषेत लिहू शकतील तेच खऱ्या अर्थाने बाल साहित्यकार म्हणता येतील.

हिंदीच्या सुप्रसिद्ध बालगीतकार श्री निरंकार देवसेवक म्हणतात ,

साहित्याचा अनेक व्याख्या प्राचीन काळापासून लोक करीत आलेले आहेत. परंतु त्यातील एका नाही बालसाहित्याची खरी व्याख्या करता आली नाही मुलांचे मन इतकी त्यांच्या नसते व त्यांच्या कल्पनेच्या प्रभावी असतात की त्यांना नियमांच्या चौकटीत बांधताच येत नाही म्हणून त्यांच्यासाठी निर्माणच्या चौकटीत बसवलेले साहित्य लिहिले जाऊ नये, तरच ते मनोरंजन करील ज्यात त्यांना रस वाटेल व ज्याद्वारे आपल्या भावना व कल्पनांचा विकास ते करू शकतील तेच साहित्य त्यांच्यासाठी लिहावे.

एवलीनर इस्टेट आपल्या 'जिंजरपाथ' या ग्रंथात चांगल्या वाङ्मयासंबंधीचे विचार मांडतात त्यातूनही बालवाग्मयाची व्याख्या सुचित होते जे पुस्तक मुलाला हसवते, रडवते, भावना उचंबळविते. जगातील क्रूरतेचा नायनाट करण्यासाठी धडपडावे असे वाटायला लावते. विचार, भाषा व आचार यात एकता आणते व सर्व मानवांनी उदार व दयाळू असावे असे वाटायला लावते तीच पुस्तके मुलांना वाचायला द्यावी.

मुलांसाठी चांगली पुस्तके कोणती याविषयी जे फ्री ट्रीज म्हणतात या पुस्तकात भाषा अशी वापरलेली असते की त्याने मनोरंजन तर होतेच परंतु त्याचबरोबर सत्यतेचे दर्शन होते. कल्पनाशक्तीला चालना मिळते व भावनांना वळण मिळते.

इंग्रजी लेखक लिलीयन स्मित बाल वाङ्मया संबंधी आपले विचार मांडताना लिहितात, मुलांसाठीची पुस्तके लिहिली जातात. ती सर्व म्हणजे बाल वाङमय नव्हे, मोठ्यांची मुलांच्या मागण्याबद्दलची कल्पना ज्ञानाच्या कल्पनेची जुळतेच असं नाही.मोठ्यांचा छोटा अवतार म्हणजे मूल अशी काहींची आगळी समजूत असते. मोठ्यांची छोटी आवृत्ती म्हणजे मूल ही कल्पना गैरसमजुतीवर आधारलेली आहे. कारण मुलांच्या आयुष्याचा अनुभव हा मोठ्यांच्या आयुष्याच्या अनुभवापेक्षा वेगळाच असतो. मुलांची जगत वेगळे असते. ज्यामध्ये त्यांची जीवनमूल्य ही मोठ्यांच्या जीवनापेक्षा भिन्न असतात.

पॉल हजार्ड यांचे याविषयी मत असे की, जी पुस्तके कलाकृतींशी प्रामाणिक असतात, जी मुलांना सहज व सरळ ज्ञान देतात, त्यातून सौंदर्य कृती सहजपणे आत्मसात केली जाते व ज्यामुळे हृदयात तरुण संवेदना निर्माण होतात तेच पुस्तके चांगली.

यावरून आपणास समजते की, बालसाहित्य म्हणजे असे साहित्य की ज्या साहित्यातून मुलांची जिज्ञासापूर्ती होते, कल्पना रम्य वातावरणामुळे मुलांचे मनोरंजन होते आणि त्यातल्या नैतिक शिकवणीने चांगले संस्कार मुलांमध्ये निर्माण होऊन त्यांचे व्यक्तिमत्व संपन्न होते.

## 5. बालसाहित्याच्या स्वरूपातील घटक:

बाल साहित्याच्या व्याख्या समजावून घेतल्या. आता आपण बाल साहित्याचे स्वरूप आणि त्यातील घटक कोणते ते समजावून घेऊया. त्यामध्ये चार गोष्टींचा समावेश होतो कथानक, वातावरण निर्मिती, पात्रयोजना आणि भाषा.

**१.कथानक**

बालसाहित्याचे स्वरूप हे कथेच्या रूपात असते. म्हणजेच गोष्ट ऐकायला सर्वांनाच आवडते.लहानापासून मोठ्यापर्यंत अगदी गोष्ट ऐकण्यासाठी सर्वजण आतुर असतात. गोष्टींमध्ये पुढे काय झाले असेल, त्या गोष्टीचा शेवट काय असेल यावर सर्वांचे लक्ष असते.

**२.वातावरण निर्मिती**

कोणत्याही साहित्यात वातावरण निर्मिती अतिशय महत्त्वाची असते. त्या गोष्टीचे हुबेहूब वर्णन केल्यामुळे गोष्ट अतिशय मजेशीर होते आणि गोष्टी पुढे काय होत असेल, याबद्दल मुलं विचार करायला लागतात. यामध्ये बऱ्याचदा पुनरावृत्तीच आहे. आधार घेतला जातो. पुनरावृत्ती मुळे बालवाचक गुंग होऊन कथेकडे अधिकाधिक आकर्षिला जातो आणि त्याला खिळवून ठेवण्याचे काम पुनरावृत्ती करत असते.

**३.पात्रयोजना**

पात्रयोजना बालसाहित्यातील पात्रे साधारणतः आवडती किंवा नावडती तसेच दुष्ट किंवा चांगली असतात.
त्या पात्रांचा अप्रत्यक्षपणे मुलांच्या मनावर परिणाम होत असतो जसं की चांगली पात्र सर्वांनाच आवडतात.पण दुष्ट पात्रे आपल्याला नकोशी वाटतात.

**४.भाषा**

बाल साहित्याची भाषा साधी सोपी असावी. एखाद्या शब्दाची किंवा वाक्याची पुनरावृत्ती केल्यामुळे होणारे बालवाचकाच्या मनात पुन्हा पुन्हा रेंगाळत राहतो.पुनरावृत्ती मुळे त्याला ते खूप काळासाठी लक्षात राहते.
साहित्याची निर्मिती आनंद आणि मनोरंजनाचे ध्येय घेऊनच त्याचा वयोगटातल्या बालकांच्या आनंद आणि मनोरंजनाच्या स्वरूप विषयीची जाणीव लेखकाला असावयास हवी यामुळे बालसाहित्याचा हेतू साध्य होण्यास मदत होईल. बाल साहित्य हे अप्रत्यक्षपणे मुलांच्या मनावर संस्कार घडवण्याचे प्रयत्न करत असते आणि त्यातूनच संस्कृती आणि परंपरा ही जपली जाते. आजूबाजूच्या परिस्थितीत प्राणी, निसर्ग, परिसर, व्यक्ती या सर्वांशी संबंध येत असतो. तसेच त्या घटकांशी आपण कसे वागावे हे सांगण्याचे काम सुद्धा आपल्याला बालसाहित्य करत असते.
बालकांच्या वयोगटाप्रमाणे त्यांच्या आवडीनिवडी भिन्न असतात. तसेच वयानुसार त्या बदलतही जातात म्हणूनच बालसाहित्यिकाने आपले लेखन करताना या सर्व बाबी ध्यानात घ्यायला हव्यात.
बाल साहित्य लिहिताना आपण आहोत, त्यापेक्षा लहान होणं तसं खूप अवघड असतं.म्हणूनच लहान होणं आणि लहान असणं आणि तसा विचार करणे या वेगवेगळ्या गोष्टी आहेत.
यामध्ये आपण बालसाहित्याच्या व्याख्या तसेच बालसाहित्याची स्वरूप म्हणजे नक्की काय हे सर्व समजून घेतले.

## 6. बालसाहित्य निर्मितीसाठी आवश्यक बालमनाचे गुणधर्म :

बालमनाचे अनेक गुणधर्म सांगता येतील. बालमनाचे असंख्य गुणधर्म आहेत.त्यापैकी काही महत्त्वाचे गुणधर्म म्हणजे नाविन्यपूर्णता,मानवीकरण,जिज्ञासा,कल्पनाप्रियता,अनुकरणप्रियता,कृतीप्रधानता,उत्कटता,विनोदप्रियता,संघर्षप्रियता,निरपेक्ष प्रेमभाव,बालसाहित्यनिर्मिती करताना बालसाहित्यकार वरीलपैकी आवश्यक गुणधर्मांचा नक्कीच विचार करतो.यातील मानवीकरण या गुणधर्मामुळे लहान मुले बालसाहित्यातील तार्किक नसलेल्या गोष्टी पटकन स्वीकारतात .
बालसाहित्यकाराला मुलांच्या निरपेक्ष प्रेमभाव या महत्त्वाच्या गुणधर्माला साहित्यानिर्मिती करताना प्रामुख्याने लक्षात घ्यावे लागते.हे सर्व गुणधर्म वापरून मोठमोठ्या बालसाहित्यिकांनी बालसाहित्यांची आस्थेने निर्मिती केली. बालसाहित्य म्हणजे नुसते मुलांसाठी लिहिलेले साहित्य नव्हे, तर मुलांकडून वाचले गेलेले साहित्य होय.
वरील सर्व बालमनाचे गुणधर्म समजणे बालसाहित्याची निर्मिती करण्यासाठी आवश्यक आहेत.ज्याला बालमन समजते त्यालाच उत्तम बालसाहित्य निर्माण करता येते,हे बालसाहित्याच्या स्वरूप व संकल्पनेच्या अभ्यासाअंती स्पष्ट होते.

## संदर्भसूची :

1. डॉ. मेहेंदळे उज्ज्वला,आव्हाड एकनाथ (२०२१)बालसाहित्य स्वरूप आणि व्याप्ती (मुंबई मराठी साहित्य संघ)
2. प्रा.महाजन, सुजाता , (२००२) बालसाहित्य: स्वरूप आणि वाटचाल, (य.च.म.मुक्त विद्यापीठ)
3. फाटक,अनुराधा ,( २००७) बालमन आणि बालसाहित्य (अमोल पब्लिशिंग हाऊस)
4. प्रा. वसेकर,विश्वास (२००२) बालसाहित्य: कविता,नाटक व चरित्र( य.च.म.मुक्त विद्यापीठ)